



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २९१ वा ❑ रविवार दि.१८ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## पराजय ठाकरे बंधूंचा आहे की मराठीचा?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

महानगरपालिकेचे निकाल मुंबई सह संपूर्ण राज्याचे लागले असून २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीत भाजपाचा झंझावात बघायला मिळाला. अनेक महानगर पालिकांमध्ये भाजपने स्पष्ट बहुमत मिळाले तर काही ठिकाणी युतीला बहुमत मिळाले.सर्वात महत्वाचे म्हणजे संपूर्ण देशाचे लक्ष मुंबई महानगर पालिकेकडे लागले होते.मुंबईमध्ये मुंबईच्या मतदारांनी ठाकरे बंधूंना सपशेल नाकारत भाजप व शिंदे सेनेच्या झोळीत बहुमत टाकले.

मुंबई महापालिकेत भाजप

मुंबई महापालिकेत भाजपने ठाकरे बंधूंना पराभव करत विजय मिळवला आहे. या विजयामुळे मुंबईमध्ये भाजप प्रथम आपला महापौर बनवणार आहे. येथे भाजपला तब्बल ८९ पेक्षा जागा मिळाल्या आहेत. तर, शिंदेंच्या शिवसेनेला २९ जागा मिळालेल्या आहेत. तर, ठाकरे बंधूंच्या युतीला ७१ मिळत असून कॉंग्रेस २४ जागांवर आहे.

मुंबई महापालिकेत भाजप

मुंबई महापालिकेत भाजपने ठाकरे बंधूंना पराभव करत विजय मिळवला आहे. या विजयामुळे मुंबईमध्ये भाजप प्रथम आपला महापौर बनवणार आहे.

मुंबईसह अनेक ठिकाणी भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. ठाकरे बंधू आणि पवार गटांना मात्र मतदारांनी नाकारले. मर्यादित प्रचार, चुकीची रणनीती, अंतर्गत वाद आणि नव्या चेहऱ्यांचा अभाव ही त्यांच्या पराभवाची प्रमुख कारणे ठरली. या निकालांनी राज्यातील राजकीय समीकरणे बदलल्याचे स्पष्ट झाले आहे. हे जरी खरे असले तरी मुंबई महापालिकेच्या निकालाने हा पराजय ठाकरे बंधूंचा आहे की मराठीचा? हा प्रश्न या अनुषंगाने निर्माण झाला आहे.भाजपाने ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढली तर मुंबई महानगर पालिकेची निवडणूक ठाकरे बंधूंनी मराठीच्या मुद्द्यावर लढली.मात्र मतदारांसमोर फडणवीस सरकारच्या झंझावापुढे मराठीचा मुद्दा निष्प्रभ ठरला.मतदारांनी मराठीच्या मुद्द्याला दुय्यम स्थान देत विकासाला प्राधान्य दिले.राज ठाकरे व युद्ध ठाकरे यांनी ज्या पोटतिडकीने मराठीचा मुद्दा घेऊन निवडणूक लढली..मतदारांपुढे हा मुद्दा चालला नाही.हा पराजय ठाकरे बंधूंचा की मराठीचा ,असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

हिंदी सक्तीच्या विरोधात किंवा मराठी रक्षणाच्या नावाखाली ठाकरेंनी एकत्र येऊन मराठी अस्मिता हा भावनिक मुद्दा वापरला, ज्यामुळे मतदारांचे दोन ध्रुवांमध्ये विभाजन होऊन त्याचा फायदा-तोटा होताना दिसतो. अलीकडे, हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात आणि मराठी रक्षणाच्या नावाखाली झालेल्या आंदोलनांनी या मुद्द्याचे ध्रुवीकरण झाल्याचे दाखवून दिले, जिथे राजकीय नेते एकत्र आले, पण यामुळे समाजातही मतभेद वाढले.

मराठी रक्षणासाठी किंवा हिंदी लादण्यास विरोध अशा नावाखाली दोन्ही भाऊ एकत्र आले.या मुद्द्यावर एकत्र येत,उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात युती झाली.महापालिका निवडणुकीतमराठी भाषा आणि संस्कृती हा महाराष्ट्रातील लोकांच्या, विशेषतः मुंबईकरांच्या भावनांशी जोडलेला विषय होता, ज्यामुळे राजकीय पक्ष याला भावनिक रंग दिला.मात्र मतदारांनी मराठीचा मुद्दा नाकारला..ठाकरे बंधूंचा पराजय झाला असला तरी ते जिंकले..इथे मराठीचा पराजय झाला.मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंच्या युतीला मोठा धक्का बसला आहे. मराठी-अमराठी मुद्द्यावरून ध्रुवीकरण होऊनही महायुतीने बाजी मारली.

मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंना पराभवाचा धक्का बसला आहे. तब्बल २० वर्षांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले. शिवसेना उबाठा आणि मनसेची युती झाली. पण या युतीला मुंबई महापालिकेवर सत्ता आणता आलेली नाही. मुंबईत महायुतीनं बाजी मारत निर्णायक आघाडी कायम ठेवली आहे. तब्बल ९ वर्षांनी मुंबई महापालिकेची निवडणूक झाली. त्यात महायुतीनं ठाकरे बंधूंना दणका दिला.मात्र हा दणका मराठीला मिळाला,असे विरोधक म्हणत असले तरी.. या निवडणुकीने जरी मतदारांनी तुम्हाला नाकारलं तरी उद्धवजी राजजी हा पर्याय आपला नसून मराठी माणसाचा पराभव आहे ज्या पोट तिडकीने आपण मराठीचा मुद्दा घेऊन मतदारांसमोर गेलात तो मुद्दा मतदारांनी समजून घेतला नाही. मतदारांनी मराठीची अस्मिता मराठीच्या भावनिक मुद्द्याला समजून घेतले असते तर विजय तुमचा निश्चितच झाला असता. या निवडणुकीत भाजपाने विकासाचा मुद्दा जरी समोर आणला असला तरी भाजपा सह इतर विरोधी पक्षांनी भाषेचे राजकारण केले.

मुंबई महानगरपालिकेत मराठी भाषेचा मुद्दा गौण ठरला, हे विधान अनेकदा राजकीय आणि सामाजिक चर्चेचा विषय ठरत असला तरी या मुद्द्याचे महत्व नाकारता येत नाही. जिथे मराठी भाषेच्या वापराला प्राधान्य देण्याऐवजी इतर भाषांना, विशेषतः हिंदी आणि इंग्रजीला, जास्त महत्त्व दिले यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनावर आणि तिच्या वापराच्या सक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, विशेषतः प्रशासनात आणि दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर कमी होत असल्याचे चित्र अनेकदा दिसते. मुंबईत विविध भाषा बोलणारे लोक मोठ्या संख्येने असल्याने, अनेकदा भाषिक सलोखा साधण्यासाठी सर्व भाषांना महत्त्व दिले जाते, पण यात मराठी मागे पडते. काहीवेळा महानगरपालिका आणि इतर सरकारी कार्यालयांमध्ये मराठीऐवजी इंग्रजी किंवा हिंदीचा वापर अधिक होतो, ज्यामुळे मराठीचा मुद्दा दुय्यम झाला,ही बाब मराठी जणांनी समजून घेतली पाहिजे.

या निवडणुकीने मराठीच्या अस्मितेवर प्रश्न निर्माण होत असला तरी दुसरी बाजू देखील समजून घेणे आवश्यक आहे.

''मराठी माणूस'', ''मराठी अस्मिता'' आणि ''मुंबई वाचवा'' अशा घोषणा निवडणुकीच्या काळात शिवसेनेसाठी नेहमीच प्रभावी ठरल्या. मात्र, प्रत्यक्ष सत्ता हातात आल्यानंतर या भावनिक मुद्द्यांचे ठोस धोरणात रूपांतर झाले नाही, हे वास्तव आहे. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे मराठी माध्यमाच्या शाळांची अवस्था. महापालिकेच्या अखत्यारीतील अनेक मराठी शाळा बंद पडल्या किंवा त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने घटत गेली. त्याच वेळी खासगी इंग्रजी शाळांचा विस्तार वेगाने झाला. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी दीर्घकालीन प्रयत्न करण्याऐवजी तिचा वापर प्रामुख्याने निवडणुकीपुरता मर्यादित ठेवण्यात आला, अशी टीका आता अधिक तीव्र होत आहे.

ठाकरे यांच्या सुमारे पंचवीस वर्षांच्या सत्ताकाळात मुंबईच्या सौंदर्यीकरणाबाबत किंवा काही मूलभूत सुविधा उभारल्याबाबत दावे करण्यात आले, मात्र 'मराठी समाज' म्हणून या घटकाची सर्वांगीण उन्नती साधण्यात अपयश आल्याचे चित्र स्पष्ट होते. केवळ भावनिक भाषणांनी पोट भरत नाही, ही जाणीव आता मराठी तरुण उघडपणे व्यक्त करू लागले आहेत. 'कमिशनखोरी' आणि 'वैयक्तिक हितसंबंध' यांसारख्या आरोपांमुळे यंदाच्या निवडणुकीत मराठी मतदारांनी वेगळा निर्णय घेतला आहे.

# क्वांटम तंत्रज्ञान:भविष्यासाठी एक मार्गचित्र

## AICTE-VAANI अंतर्गत दोन दिवसीय ऑफलाईन परिसंवाद

छत्रपती संभाजीनगर : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद- भारतीय भाषांच्या प्रगती आणि संगोपनासाठी सशक्त समर्थन (AICTE-VAANI) अंतर्गत ''क्वांटम तंत्रज्ञान: भविष्यासाठी एक मार्गचित्र'' या विषयावर १९ व २० जानेवारी २०२६ रोजी दोन दिवसीय ऑफलाईन परिसंवादाचे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या, छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचा उद्धाटन समारंभ प्रमुख पाहुणे माननीय प्रा. (डॉ.) कारभारी काळे, कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड व सन्माननीय अतिथी माननीय डॉ. किरण लधाणे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

सदरील परिसंवाद छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रणजीत मुळे, सचिव मा. श्री. पद्माकरराव मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे व उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार यांच्या नेतृत्वाखाली हा परिसंवाद राबविण्यात येणार आहे.

हा परिसंवाद मराठी भाषेत आयोजित करण्यात येत असून, क्वांटम तंत्रज्ञान या उदयोन्मुख क्षेत्रातील सध्याचे संशोधन, उपयोग व भविष्यातील संधी याबाबत जनजागृती करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

या परिसंवादात NIT, CDAC पुणे आणि बेंगळुरू तसेच नामांकित संस्थेतील व उद्योग क्षेत्रातील तज्ञ वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. क्वांटम कम्प्युटिंग, क्वांटम सेन्सिंग, क्वांटम क्रिप्टोग्राफी, क्वांटम कम्युनिकेशन व क्वांटम नॅनो-डिव्हाइसेस अशा विविध विषयांवर सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

या कार्यशाळेत AICTE मान्यताप्राप्त संस्थांमधील प्राध्यापक, संशोधक, एम.टेक विद्यार्थी, संशोधन सहकारी तसेच उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक सहभागी होऊ शकतात. इच्छुकांनी AICTE ATAL Portal वर नोंदणी करणे आवश्यक आहे.

सदरील परिसंवादाचे आयोजन इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी (व्ही. एल.एस.आय. डिझाइन आणि तंत्रज्ञान) विभाग यांच्या वतीने करण्यात येत असुन विभागप्रमुख डॉ. श्रीकांत होनाडे, संयोजक आणि समन्वयक व श्री. गणेश पाटील, सह-समन्वयक म्हणून कार्य पाहत आहेत. मराठीसारख्या प्रादेशिक भाषेत आयोजित होणारा हा AICTE-VAANI परिसंवाद संशोधन, नवोपक्रम आणि शैक्षणिक सहकार्याला चालना देणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# विसावलेल्या पाऊलखुणात..!

**ज्योतिर्मय साहित्य**

हुरहुरत्या कातर वेळी विसावलेली ती अन् तिच्यात उमटलेल्या त्या पाऊलखुणात काकोळली.

व्याकुळ ती निहारते त्याला अबोल

निसटता तो क्षण किती अनमोल

गजबज, किलबिल, गोंगाट भारावलेले सारे क्षण..! अन् आज आलेला हा निवांतपणा आणि रितेपणा मनाच्या पोकळीत सामावला.



ती उन्हे स्मरणात, मावळतीच्या दारातून आत जाण्याआधी पाना पानाआडून कुशीत पहुडताना जीवनाच्या नव्या वाटेवर अलिप्ततेच्या दूर काठांवर निशेत विलगतात. नि काही क्षणाच्या व विरामानंतर वाटेवाटेने पांगतात.

हळूवार एक नजर मागे वळली. मनात कितीतरी सोनेरी क्षण, साठवून, एक लांब श्वास घेत, पाऊले त्या दूरच्या वाटेवर अनामिक ओढीनी धावू लागली, माहीत नाही का, पण मन उगी सुटलेल्या क्षणात पाझरू लागले. पळणारी पाऊले अन दूर देश मनात हुरहूर होऊन हळवा झाला. हाताचे ते पालव ..!सर्रकन उडालेली धूळ वेगवेगळ्या वाटांनी पांगली.

आकाशातून धावणारे ते ढग आणि दुपारच्या त्या सावल्यांना आलेली शितलाई मनाला सुखावत वळण वाटेवर मार्गस्थ झालेली हेमंतातील ती थंडी आणि दुपारच्या उष्णतेने त्याची झालेली ती शुभ्र धवल चादर अन् पाना पानातून थब थबणारे ते दवबिंदू ओंजळीत समावताना एका सुखद अनुभूतीचा अनुभव देत होती.



***सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.***
***श्री क्षेत्र निनाम-सातारा***
***सं. क्र.-९७६७४३७९२३***

मनाच्या त्या गतीला कोण थांबवणार!

तेव्हाच्या त्या क्षणांची ती अपूर्वाई

असंख्य क्षणांची साक्ष देई.

स्मृति गंधातील आनंदी क्षणांच्या आनंदाचे

चांदणे शिंपीत अंगणी उतरून येई.

आत्ता आत्ता काल परवाच तर ओढीने चालणारी पाऊले..! ती लगबग, ती उत्सुकता, उत्कंठा, नव्याने काहीतरी जाणून घेण्याची ती जिज्ञासा किती हो खरंच किती अन् काय काय? आणि काही क्षणाच्या एका ऋतू चक्र आणि प्रतिक्षेनंतर..! नजरेत सामावले ते ठिकठिकाणी असलेले साहित्यिक आणि त्यांच्या साहित्य कृतीचे फोटो,ती शाईची दौत आणि लेखणी, एका प्रेरणेने नव्या उत्साहात मायबोली मराठी शब्दांतून आपोआपच ओठावर रेंगाळले. आणि ओवीच्या दोन ओळी गुंफण्याचा मोह आवरता आला नाही.

पहिली माझी ओवी गं
माझ्या माय बोली मराठीला,
ओवी, अभंग, भारुड कविता
अन् तिच्यातील साहित्याला,
किती किती रूपात भेटते नव्याने
काही काही सामावते तिच्यात
तिच्या विस्तृत अन् सुंदर रूपाला..

ही माझी मराठी अन् खूप काही सामावलेल्या या मराठीची मी सहज म्हणून नजर वर जाताच ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही अक्षरे अभिमानाने उंच आकाशाला गवसणी घालत होती. प्रवेश द्वारावरचा म पाहताच एका शाई पेनाच्या निबचे टोक आणि त्यावर ते वर्तुळाकार टोकावरचा तो मनी आणि वहीचे चित्र नयनात सामावले. टोकावरील बिंदू पाहताच यातून उमटणारी ती अक्षरे,भले ती कोणत्याही भाषेतील असोत. पण ती जेंव्हा कोऱ्या कागदावर उमटतात तेंव्हा एक इतिहास घडवतात. पृथ्वीच्या आकाराची आणि तिच्यात सामावलेल्या त्या सर्व काहींची एका क्षणाला आठवण झाली. कित्ती ना या टोकात किती ताकद ना न राहून मनात आले,माझ्या मराठीत ही असेच खूप काही सामावले आहे.

प्रवेश द्वारातून आत प्रवेश करताच नजर आपोआप नतमस्तक झाली. अन् मनातल्या मनात त्या सर्व शूर वीरांच्या चरणी नतमस्तक झाले. स्वराज्य संस्थापक श्रीमंत योगी श्री छत्रपती शिवाजी महाराज,धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्य विस्ताराक छत्रपती शाहू महाराज, आधुनिक साताऱ्याचे शिल्पकार, छत्रपती प्रताप सिंह महाराज (थोरले) यांच्या प्रतिमा नजरेत येताच या महाराष्ट्राची महाराष्ट्र कन्या, आणि महाराष्ट्रातील हिरवाईने नटलेल्या मराठा साम्राज्याची राजधानी असलेल्या, सह्याद्रीच्या कुशीत विसावलेल्या साताऱ्यातील जो सातारा ऐतिहासिक शूरवीरांच्या शौर्याने पावन झालेल्या तसेच निसर्गाने संपन्न अशा साताऱ्यातील मी सातारा कन्या असल्याचा अभिमान वाटू लागला. आणि..,

मला आहे माझ्या साताऱ्याचा अभिमान,
जिथे होते आहे अ. भा. मराठी साहित्य संमेलन
जिथे होते आहे अ. भा. मराठी साहित्य संमेलन
अशा साताऱ्याचा मला आहे अभिमान, हो जी जी
इतिहासाच्या पाना पानातून
ऐतिहासिकतेचे दाखले देणारा,
शूरवीरांच्या शौर्याने पावन झालेला
निसर्गाच्या हिरवाईने नटलेला
सात डोंगरांच्या रांगेत अन्
सह्याद्रीच्या कुशीत विसावलेला हो जी जी
सह्याद्रीच्या कुशीत विसावलेला मला त्याचा अभिमान हो जी जी..
माझ्या साताऱ्याचा मला अभिमान हो जी जी

गर्दीतून पुढे वाट काढत पाऊले थबकली ती व्यसन मुक्तीचा जागर करीत उभे असणारे संजय झट्टू यांच्यापाशी सुरुवातीला कुतुहल वाटले.की हे काय आहे! पण थोडे फार जाणून घेतल्यानंतर जाणवले की खरंच काही काही व्यक्ती ध्येयाने किती प्रेरीत झालेल्या असतात.या समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची धडपड त्यांच्या ध्यास कृतीतून जाणवला.

फोनवरील संभाषणातून इकडे तिकडे करत मार्ग काढणारी पाऊले

अन् समोर दिसणारी साहित्यिक ,सामाजिक, शैक्षणिक, ज्येष्ठ, लहान थोर व्यक्तिमत्त्वांचा मेळा आणि एक अभंग स्फुरला.

साहित्याच्या पंढरीत ।
विचारवंताचा मेळा ।
साहित्याची मांदियाळी ।
सारस्वत झाले गोळा ।।१।।

अभंगाच्या चार ओळी गुंफता गुंफता कोण, कुठे, कसे? असे अनेक प्रश्न मनाच्या खलबळीच्या कोपऱ्यात स्थिरावले. ध्वजारोहण, ग्रंथ प्रदर्शन चे उद्घघाटन, कवीकट्टा, गझल कट्टा, ग्रंथ दिंडी चित्र रथ,बालवाचक कट्टा, प्रेरणा ज्योत मराठी भाषेवर भरभरून प्रेम करणाऱ्या या साहित्याच्या पंढरीत एकत्र आलेले विचारवंत खूप सुंदर वाटले. रस्त्यावरून धावणाऱ्या त्या गाडीच्या चाका प्रमाणे मन ही धावू लागले. अन् एक क्षण आला झाडाच्या त्या सावली प्रमाणे काही क्षणा नंतर निश्चित ठिकाणी स्थिरावले. कवी कट्ट्यावर वैविध्यपूर्ण सुंदर कवितांचा आस्वाद घेत शेवटी तो क्षण आला .ज्याची इतक्या दिवस अगदी आतुरतेने वाट पाहिली. थोडा संकोचाचा पडदा होता. पायीचे बळ लटपटत होते. पण आत्मविश्वासाचे बळ मिळाले नि मग, कवितेचे नाव ही दामिनी दामिनीचे बळ अंगात संचारले,

**(क्रमशः)**


